


ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
Reg.No. 2/12883
Estd. June-1998
Tal. Gadhinglaj, Dist. Kolhapur
GADHINGLAJ

माजी विद्यार्थी सागर गंधवाळे यांचा प्रामाणिकपणा: आपल्या किराणा दुकानाजवळ 32500 रुपयांचे सापडलेले पाकीट संबंधीतांना परत केलेबद्दल सत्कार करताना समन्वयक डॉ. डी. जी. चिबळीकर व अध्यक्ष सुभाष कोंबडे, उपाध्यक्ष शिवराज सावंत आणि इतर

दिनांक 10-04. 2023

**समन्वयक**
**माजी विद्यार्थी संघटना**
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
Reg.No. 2/12883
Estd. June - 1998
Tal. Gadhinglaj, Dist. Kolhapur.
GADHINGLAJ

**प्रभारी प्राचार्य**
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

# गडहिंग्लजमध्ये सापडलेले ३२ हजाराचे पाकिट प्रामाणिकपणे परत



गडहिंग्लज : सागर गंधवाले यांचे अभिनंदन करताना शिंदे परिवार आणि राजेंद्र प्रसाद मित्रमंडळाचे कार्यकर्ते, पदाधिकारी.

प्रतिनिधी
गडहिंग्लज

गडहिंग्लज – काळभैरी मार्गावर असणाऱ्या मारुती मंदिर नजीक असलेल्या बस स्टॉप जवळ गुरुवारी सायंकाळी मिळालेले विद्यार्थ्याचे पाकीट आणि त्यातील ३२ हजार ५००, इतर कागदपत्रे प्रामाणिकपणे परत दिल्याबद्दल सागर गंधवाले यांचा सत्कार आप्पा उर्फ सुधीर शिवणे यांच्या हस्ते करण्यात आला. गंधवाले यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करण्यात येत आहे.

ओमकार शिंदे हा विद्यार्थी गुरुवारी कोल्हापूरहून गडहिंग्लजला आल्यानंतर भैरी मार्गवरील हनुमान मंदिर जवळील बस स्टॉपवर उतरला. यादरम्यान त्याच्या खिशातील पाकीट खाली रस्त्यावर पडले. पण त्याच्या लक्षात आले नाही. तो तसाच पुढे राजेंद्रप्रसाद रोडवरील घरी गेला. ओमकारला लक्षात आल्यानंतर तो तातडीने बस स्थानकातील आगारप्रमुखांना भेटून बस मध्ये पाकीट पडल्याची तक्रार केली होती. दरम्यान ते पाकीट भैरी रोडच्या बसस्टॉप जवळ पडले होते. शेजारी सागर गंधवाले यांचे किराणा मालाचे दुकान असल्याने त्यांना पाकीट सापडले. त्यांनी ते ताब्यात घेतले. त्या पाकीटमध्ये आधार कार्ड, पॅनकार्ड, कॉलेजचे ओळखपत्र आणि रोख ३२ हजार ५०० रुपये असल्याचे आढळून आले. सागर याने कागदपत्राच्या आधारे ओमकार शिंदेला संपर्क साधून आपले पाकीट आणि रक्कम सुखरूप असल्याचे सांगितले. त्यांनी ती रक्कम ओळख पटवून घेऊन गेला. एवढी मोठी रक्कम आणि मूळ कागदपत्र प्रामाणिकपणे परत दिल्याबद्दल राजेंद्र प्रसाद रोड मित्र मंडळाच्या वतीने सागर गंधवाले यांचा सत्कार करण्यात आला. या प्रामाणिक कार्याबद्दल सागर गंधवाले यांची शहरातील विविध समाज माध्यमातून कौतुक होत आहे.

समन्वयक
माजी विद्यार्थी संघटना
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

COMMERCE & SCIENCE COLLEGE GADHINGLAJ
Reg.No. 2/12883
Estd. June-1998

प्रभारी प्राचार्य
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर